भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ५५७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०६/०८/२०१७

**१) अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०५/०८/२०१७ चे १६.०० वा. दर. यातील अल्पवयीन फिर्यादी मुलीला यातील आरोपीने अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन तिच्या गळया खालील टॉप ओढुन तिला खाली ओढले त्यामुळे फिर्यादी मुलीची बेईज्जती झाली म्हणुन ती आपल्या आईसह पो. स्टे. ला येवुन तोंडी रिपोर्ट दिल्याने व फिर्यादी मुलीगी व आरोपी हे दोघेही भिन्न जातीची असल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३५४(अ)(४)भादंवि. सहकलम ३(२)(व्ही.ए),३डब्लु(आय)ॲक्ट्रासिटी ॲक्ट सहकलम १२ पोक्सो ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. मेसरे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**२) महिलेचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०५/०८/२०१७ चे १०.१५ वा. दर. यातील फिर्यादी ही आरोपीचे कार्यालयातील आस्थापना शाखेमध्ये कामा निमीत्त गेली असता यातील आरोपीने फिर्यादीस characterless असे बोलुन विनयभंग केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३५४(अ)(१)(४)भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. आत्राम पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**३) घराचा ताला तोडुन जर्मन डब्यातील सोन्या व चांदीचे दागीने व नगदी पैश्याची चोरी केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०५/०८/२०१७ चे ११.३० ते १७.३० वा. दर. यातील कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन फिर्यादीचे घराचे समोरील दाराचा ताला तोडुन आत प्रवेश करुन घरात असलेल्या जर्मन डब्यात ठेवलेली एक गरसोळी त्यामध्ये ३ ग्रॅम, सोन्याचा लॉकेट व २ ग्रॅम सोन्याचे एकुण ४ ठोकड मनी, ३ ग्रॅम सोन्याचे एकुण ६ कारले मनी, ४ ग्रॅम सोन्याचे एकुण ४० बारीक मनी असा एकुण १२ ग्रॅम सोन्याची गळसोळी, २ जोडी चांदीचे तारळया एकुण ८० ग्रॅम व नगदी ३,०००/—रु. असा एकुण २७,०००/—रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी सौ. शेवंता दशरथ पोहणकर वय ४९ वर्ष, रा. ताडेश्वर वार्ड पवनी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ४५७,३८० भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**४)संगनमत करुन बनावट मतदान ओळखपत्र बनवुन शेतीची विक्रीची फसवणुक केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १४/०७/२०१७ चे १५.०० वा. ते १५.३० वा. दर. यातील आरोपीतांनी संगनमत करुन महादेव सिंदपुरे रा. भिकारखेडा याचे महादेव बुधे रा. भिकारखेडा असे बनावट मतदान ओळखपत्र बनवुन ते खरे असल्याचे सादर करुन शेतीची विक्री केल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट व कागदपत्र बनावट असल्याचा पुरावा दिल्याने फिर्यादी राजाभाऊ दतोबा पवार वय ५० वर्ष, रा. मोहाडी (दुय्यम निबंधक श्रेणी मोहाडी ) यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ४१९,४२०,४६८,४७१,३४ भादंवि. सहकलम ८२,८३भारतीय नोंदणी अधि. १९०८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गिऱ्हेपुंजे पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

**५) संगनमत करुन शेतीच्या हिस्यावाटपाचे कारणावरुन भांडण, शिवीगाळ करुन सायकलचा गेर व कुऱ्हाडीच्या दांडयाने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०१/०८/२०१७ चे ०९.३० वा. दर. यातील फिर्यादीचा जखमी भाऊ मंगल बिसन कुथे वय ६० वर्ष, रा. सरांडी बु. हा चौकात ऊभा असतांनी यातील आरोपी क्र. १ हा त्याचे जवळ येवुन शेतीच्या हिस्यावाटपाचे कारणावरुन शिवीगाळ, भांडण करुन हाता बुक्यांनी पाठीवर, छातीवर, मारहान केली त्यामुळे फिर्यादी जखमी हीने तु माझ्या भावाला कशाला मारतो म्हणुन आडवी झाली असता आरोपी क्र. १ ने फिर्यादीचे उजवे हाताला व डावे हाताचे मनगटाला आपले हातातील सायकलचा गेर ने मारुन व कुऱ्हाडीचा दांडा उजवे हाताचे भुजेवर मारुन जखमी केले व तुम्ही शेतावर गेले तर तुमच्या गिरक्या(तुकडे) करीन अशी धमकी दिली आरोपी क्र. २ हीने फिर्यादी जख्मीस शिवीगाळ करुन ढकलढुकल केल्याने फिर्यादी सौ. शालु यशवंत भुरले वय ५० वर्ष, रा. सरांडी बु. यांचे बयान व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३२४,३२३,५०४,५०६,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. गोंधुळे पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

**६) अवैध दारु/जुगार अडयावर धाडी . :—**

दिनांक ०५/०८/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो स्टे कारधा व अडयाळ येथे अवैध दारू/जुगार अडयावर धाडी घालुन एकुण ३ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ७ लिटर हा.भ. दारू किंमती ७००/—रु. तसेच जुगारातुन किंमती ५२५ /—रु. असा एकुण किंमती १,२२५ /रु चा माल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस अधिक्षक कार्यालय भंडारा (म.रा.)

06.8

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.